दिनांक :-२०/१२/२०२३

**प्रस्तावना :-** भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, धोकादायक / अतिधोकादायक इमारती, रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या मिळकती तसेच मनपा स्व-मालकीच्या मिळकती (कर्मचारी निवास इमारती,मनपा शाळा इ.) स्वामीत्व धन (Royalty) भरणेच्या अटीवर निष्कासित करणेकामी प्राप्त झालेल्या निविदाकार व निविदाकारांनी सादर केलेल्या स्वामीत्व धनाच्या दरास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अनधिकृत / बिगर परवाना बांधकामे, धोकादायक / अतिधोकादायक इमारती, रस्तारुंदीकरणात बाधित होणाऱ्या इमारती Royalty (स्वामीत्व धन) भरण्याच्या अटीवर निष्कासित करणेकामी प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय ठेकेदार नियुक्त करणेबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. मान्यता दिल्यानुसार दि. २७/०९/२०२३ ते ०९/१०/२०२३ या कालावधीत निविदा प्रसिध्द करण्यात आली होती मात्र सदर निविदेमध्ये प्रभाग समिती क्र. १ व ५ करीता प्रत्येकी ०१ निविदाकार प्राप्त झाले होते तसेच प्रभाग समिती क्र. २, ३ व ४ करीता एकही निविदाकार प्राप्त न झाल्याने निविदा स्पर्धात्मक होणेच्या दृष्टिने अटी शर्तीमध्ये सुधारणा करून फेर निविदा सादर करणेचे निर्देश मा. प्रशासक तथा आयुक्त सो.यांनी दिले होते.

त्यानुसार दि.१८/१०/२०२३ ते २६/१०/२०२३ या कालावधीत फेर निविदा प्रसिध्द करण्यात आल्या असता एकूण ०३ निविदाकार प्राप्त झाल्याने प्राप्त निविदाकारांनी सादर केलेल्या दस्तावेजांची पाहणी मा. निविदा समिती समक्ष केली असता ०३ निविदाकारांपैकी ०२ निविदाकार कागदपत्र छाननी मध्ये अपात्र ठरल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्र सीएटी/२०१७/प्र क्र०८/इमा-२, दि. २७/०९/२०१८ मधील परिच्छेद क्र. ४.४ मधील तरतुदीनुसार सदरची निविदा रद्द करून दि. ०८/११/२०२३ ते दि.१५/११/२०२३ या कालावधीत द्वितीय मागणी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर द्वितीय मागणी निविदेच्या अनुषंगाने दि. २०/११/२०२३ रोजी संगणक विभागाकडील प्राप्त अहवालानुसार याकामी पुनश्च: ०३ निविदाकार प्राप्त झाल्याने निविदाकार यांचे लिफाफा क्र. १ खुले करून आवश्यक दस्तावेजांची पुर्तता मा. निविदा समिती समक्ष सादर करण्यात आली असता ०२ निविदाकार अपात्र ठरले असून ०१ निविदाकार पात्र असल्याने **लिफाफा क्र.२ खुले करणेसाठी शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२, दिनांक** २७/०९/२०१८ **मधील परिच्छेद क्र.४.३ मध्ये नमूद केलेनुसार** कार्यवाही करण्यात आलेली आहे. तद्नंतर खालील निविदाकार यांचा लिफाफा क्र. २ खुला करण्यात आला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | प्रभाग समिती क्र. | ऑनलाईन टेंडर क्र. | कामाचे नाव | निविदाकाराचा तपशिल | स्वामीत्व धनाची प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ९६१४२२ | **भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, धोकादायक / अतिधोकादायक इमारती, रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या मिळकती तसेच मनपा स्व-मालकीच्या मिळकती (कर्मचारी निवास इमारती,मनपा शाळा इ.) स्वामीत्व धन** (Royalty) **भरणेच्या अटीवर निष्कासित करणेकामी ठेकेदार नियुक्त करणे.** | Sahara Traders | ३५ |
| २ | २ | ९६१४४१ | | | ३५ |
| ३ | ३ | ९६१४५१ | | | ५२ |
| ४ | ४ | ९६१४८६ | | | ५२ |
| ५ | ५ | ९६१४९६ | | | ५२ |

वरील पात्र निविदाकार यांचे लिफाफा क्र. २ खुले करण्यात आले असता प्रभाग समिती क्र. **१** व **२** करीता **३५** टक्के व प्रभाग समिती क्र. **३, ४** व **५** करीता **५२** टक्के प्रमाणे स्वामीत्व धन भरणेचे दर प्राप्त झाले झाल्यानुसार सदर कामी महापालिकेने निर्धारित केलेल्या अटी शर्तीमधील अट क्र. ५२ चा विचार करता, निविदाकाराने प्रभाग समिती क्र. ३, ४ व ५ मध्ये ५२ टक्के एवढे उच्चतम दर नमूद केलेले असल्याने प्रभाग समिती क्र. १ व २ मध्ये सुध्दा ५२ टक्के या उच्चतम दराने काम करणेस तयार आहेत किंवा कसे याबाबत जा.क्र./भिनिशमनपा/अ.बां.व अ.नि.वि./१३६९/२०२३ दिनांक ०५/१२/२०२३ अन्वयेपत्र देऊन विचारणा करण्यात आली असता मे. सहारा ट्रेडर्स, भिवंडी यांचे दि. ०६/१२/२०२३ रोजी पत्र प्राप्त झाले असून सदर पत्रामध्ये प्रभाग समिती क्र. ३, ४ व ५ प्रमाणे प्रभाग समिती क्र. १ व २ मध्ये सुध्दा ५२ टक्के या उच्चतम दराने काम करण्यास तयार असलेबाबतचे पत्र सादर केले आहे.

तरी मे. सहारा ट्रेडर्स, भिवंडी यांनी प्रभाग समिती क्र. १ ते ५ करीताच्या निविदेमध्ये ५२ टक्के या उच्चतम दराने काम करणेस तयार असल्याचे कळविले असून सदर दरास विभाग तसेच लेखा विभागाच्या शिफारशी अंती मंजुरी देण्यात आली आहे. सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार संविदा होणेकरीता मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी ही विनंती.

**प्रशासकीय ठराव क्र.** 390 **दिनांक :-** 29/12/**२०२३**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, धोकादायक / अतिधोकादायक इमारती, रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या मिळकती तसेच मनपा स्व-मालकीच्या मिळकती (कर्मचारी निवास इमारती, मनपा शाळा इ.) स्वामीत्व धन (Royalty) भरणेच्या अटीवर निष्कासित करणेकामी मे. Sahara Traders, Bhiwandi यांनी स्वामीत्व धनाचे (Royalty) ५२ टक्के प्रमाणे दर सादर केले असून सदर दरास व निविदाकारास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणेकामी विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र.७१/ (भाग२)/नवि, दि. ०६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, मा. महानगरपालिका महासभा, मा. स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करून, प्रभाग समिती क्र. १ ते ५ कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, धोकादायक / अतिधोकादायक इमारती, रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या मिळकती तसेच मनपा स्व-मालकीच्या मिळकती (कर्मचारी निवास इमारती, मनपा शाळा इ.) स्वामीत्व धन (Royalty) भरणेच्या अटीवर निष्कासित करणेकामी मे. Sahara Traders, Bhiwandi यांनी स्वामीत्व धनाचे (Royalty) ५२ टक्के प्रमाणे दर सादर केले असून सदर ५२ टक्के स्वामीत्व धन (Royalty) दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

O/C